21 APR 2025
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर राष्ट्रीय मोहर

## 'आयआयएससी'सोबत संयुक्त संशोधन प्रकल्प



। कोल्हापूर : भारतातील नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा डीएसटी-पेअरच्या 'हब-अँड-स्पोक' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू यांच्याशी 'स्पोक' म्हणून जोडले जात आहे. अशा पद्धतीच्या देशातील अवघ्या ३२ राज्य अकृषी विद्यापीठांपैकी शिवाजी विद्यापीठ एक ठरले आहे. विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर या निमित्ताने राष्ट्रीय मोहर उमटली आहे. केंद्रीय मंत्रालयाचे सचिव प्रा. अभय करंदीकर यांनी शनिवारी सकाळी संबंधित शैक्षणिक संस्थांसमवेत ऑनलाइन बैठक घेऊन ही घोषणा केली.

भारतीय विद्यापीठांची संशोधन व विकासाची क्षमता वाढवण्यासाठी केंद्राने स्थापित केलेल्या अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशनच्या अंतर्गत पार्टनरशिप फॉर ॲक्सिलरेटेड इनोव्हेशन अँड रिसर्च हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला. देशातील उच्चस्तरीय संस्था आणि उदयोन्मुख संशोधन क्षमता असलेल्या विद्यापीठांमध्ये परस्पर संशोधन सहकार्य वाढवणे, असा त्यामागील उद्देश आहे.

हा पेअर कार्यक्रम हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे कार्य करेल. नोडल 'हब' म्हणून काम करणारी केंद्रीय संस्था देशभरात संशोधन आणि नवोपक्रम चालवण्यासाठी किमान सात संस्थांशी भागीदारी करेल. त्यांना यात 'स्पोक' असे संबोधले आहे. एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशात पहिल्या स्थानी असलेल्या बंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाची स्पोक संस्था म्हणून निवड केली आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा शनिवारच्या बैठकीमध्ये जाहीर करण्यात आला. या टप्प्यामध्ये सात उच्चस्तरीय संस्थांची नावे 'हब' म्हणून जाहीर करण्यात आली. त्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससह आयआयटी-इंदोर, आयआयटी-मुंबई, आयआयटी-रोपार, एनआयटी-रुरकेला, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली आणि केंद्रीय विद्यापीठ, हैदराबाद यांचा समावेश आहे. त्यांच्यासमवेत 'स्पोक' म्हणून संशोधन कार्य करण्यासाठी देशातील एकूण ४३ शैक्षणिक संस्थांची निवड करण्यात आली आहे. त्यात ३२ राज्य अकृषी विद्यापीठे, ६ केंद्रीय विद्यापीठे आणि ७ एनआयटी यांचा समावेश आहे. या ३२ राज्य विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे.

## विद्यापीठाची निवड अभिमानास्पद

यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले की, 'पेअर'सारख्या देशातील एका अत्यंत महत्त्वाकांक्षी संशोधकीय उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड होणे ही बाब अभिमानास्पद आहेच; पण त्याच बरोबर देशातील रँकिंगमध्ये क्रमांक एकवर असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सबरोबर स्पोक म्हणून संशोधन करण्याची संधी मिळणे, ही विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर शिक्कामोर्तब करणारी बाब आहे. 'आयआयएससी'सारख्या दिग्गज संस्थेसोबत संशोधन करण्याची संधी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना व विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्याचप्रमाणे त्या संस्थेतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधकांकडून मार्गदर्शन मिळाल्याने शिवाजी विद्यापीठाची एकूण संशोधन मानके उंचावण्याची आणि शैक्षणिक क्षेत्रात नवोपक्रमांना चालना मिळण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. हे संशोधन सहकार्य पुढील काळात अधिक वृद्धिंगत होत जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

21 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आयआयएससी' सोबत राबविणार संयुक्त संशोधन प्रकल्प!

## शिवाजी विद्यापीठाचे मोठे यश; संशोधकीय दर्जावर राष्ट्रीय मोहोर; उपक्रमाचा पहिला टप्पा जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतातील नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी अशा डीएसटी-पेअरच्या 'हब-अँड-स्पोक' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर यांच्याशी 'स्पोक' म्हणून जोडले जात आहे. अशा पद्धतीच्या देशातील ३२ राज्य अकृषी विद्यापीठांपैकी शिवाजी विद्यापीठ एक ठरले आहे. विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर या निमित्ताने राष्ट्रीय मोहोर उमटली आहे. केंद्रीय मंत्रालयाचे सचिव प्रा. अभय करंदीकर यांनी ऑनलाईन बैठक घेऊन ही घोषणा केली.

उपक्रमाचा पहिला टप्पा जाहीर करण्यात आला. या टप्प्यामध्ये सात उच्चस्तरीय संस्थांची नावे 'हब' म्हणून जाहीर करण्यात आली. त्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससह आयआयटी-इंदोर, आयआयटी- मुंबई, आयआयटी-रोपार, एनआयटी- रुरकेला, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली आणि केंद्रीय विद्यापीठ, हैदराबाद यांचा समावेश आहे. त्यांच्यासमवेत 'स्पोक' म्हणून संशोधनकार्य करण्यासाठी देशातील ४३ शैक्षणिक संस्थांची निवड करण्यात आली आहे. त्यात ३२ राज्य अकृषी विद्यापीठे, ६ केंद्रीय विद्यापीठे व ७ एनआयटी यांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ अॅडव्हान्स्ड मटेरियल सायन्समधील आधुनिक संशोधन करणार आहे. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, संगणकशास्त्र, संख्याशास्त्र आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागांतील संशोधकांचा सहभाग असणार आहे.





"'पेअर'सारख्या देशातील एका महत्त्वाकांक्षी संशोधकीय उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड होणे ही बाब अभिमानास्पद आहे. त्याचबरोबर देशातील रँकिंगमध्ये क्रमांक एकवर असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सबरोबर स्पोक म्हणून संशोधन करण्याची संधी मिळणे विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर शिक्कामोर्तब करणारी गोष्ट आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधकांकडून मार्गदर्शन मिळाल्याने संशोधन मानके उंचावण्याची व शैक्षणिक क्षेत्रात नवोपक्रमांना चालना मिळण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### प्रत्येक नेटवर्कला शंभर कोटींचा निधी

प्रकल्पांतर्गत प्रत्येक हब-अँड-स्पोक नेटवर्कला शंभर कोटी रुपयांचा निधी केंद्राकडून मिळणार आहे. यातील ३० टक्के निधी हब म्हणून काम करणाऱ्या संस्थेला व ७० टक्के निधी स्पोक म्हणून निवडलेल्या संस्थांसाठी असेल. हब असणारी संस्था आपल्याशी जोडलेल्या स्पोक संस्थांना संशोधकीय मार्गदर्शनाबरोबरच आवश्यक संसाधने, उपकरणे आणि सुविधा प्रदान करतील.

21 APR 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षेवर विद्यापीठाची करडी नजर

## उद्यापासून परीक्षा सुरू : महाविद्यालयांनी पदवी प्रथम आणि व्दितीय सत्राच्या परीक्षा घेतल्या स्वत:कडे : नवे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ सुरूवातीपासूनच पदवी प्रथम वर्ष ते पीएच. डी. पर्यंतच्या सर्व परीक्षा स्वत: घेत होते. परंतू मध्यंतरी महाविद्यालयांनी पदवी प्रथम वर्षाचे प्रथम व व्दितीय सत्राच्या परीक्षा स्वत: घेतल्या. परंतू यामध्ये गुणवत्ता ढासळत असल्याचे विद्यापीठाच्या लक्षात आल्यानंतर पुन्हा एकदा विद्यापीठ परीक्षा घेणार, असा प्रस्ताव अधिकार मंडळासमोर विद्यापीठ परीक्षा विभागाने ठेवला. याला महाविद्यालयांनी कडाडून विरोध करीत आपणच परीक्षा घेणार अन्यथा असहकाराची भूमिका घेतली. त्यामुळे विद्यापीठाची प्रश्नपत्रिका आणि परीक्षा मात्र महाविद्यालय घेण्यास अधिकार मंडळाने मंजुरी दिली. या परीक्षा २२ एप्रिलपासून सुरु होणार असून, महाविद्यालय परीक्षा घेणार असले तरी विद्यापीठाची करडी नजर राहणार आहे.

शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी गतवर्षीपासून शिवाजी विद्यापीठाने परीक्षा घेण्याची तयारी दाखवली आहे. या परीक्षा विद्यापीठ अंतर्गत स्वायत्त न झालेल्या महाविद्यालयांच्या असणार आहेत. तरीही त्या महाविद्यालयांनी विद्यापीठाने परीक्षा घेण्यास विरोध केला आहे. महाविद्यालयांनी प्रश्नपत्रिका काढल्या तर पाठीमागील कांही प्रश्नपत्रिकेतील प्रश्न पुढच्या परीक्षेला यायचे. यातील काही प्रश्न परीक्षे अगोदरच विद्यार्थ्यांना माहीत असतात. किंवा परीक्षे दरम्यान प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकारही अनेकदा घडले आहेत. एवढेच नव्हे तर सामुदायिक कॉपीचे प्रकारही यापुर्वी काही महाविद्यालयात उघडकीस आले आहेत. म्हणून परीक्षा विद्यापीठच घेणार असा प्रस्ताव विद्यापीठातील परीक्षा विभागाने अधिकार मंडळासमोर ठेवला होता. सदस्यांकडून प्रस्ताव फेटाळण्यात आला. परिणामी परीक्षा स्थगित करण्याची वेळ प्रशासनावर आली. आता नव्याने वेळापत्रक जाहीर केले असून २२ एप्रिलपासून पदवी प्रथम वर्षातील प्रथम व व्दितीय सत्राच्या परीक्षा घेणार आहेत.




- कॉपीसारखे गैरप्रकार उघडकीस आलेल्या महाविद्यालयावर बैठी पथकाची नियुक्ती

### विद्यार्थी गळती थांबवण्यासाठी प्रयत्न

महाविद्यालयात शिकवले जाणाऱ्या पारंपारिक विषयाची विद्यार्थी संख्या कमी होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्या गळती थांबून विद्यार्थी कायमस्वरूपी टिकावेत म्हणून महाविद्यालय अनेक प्रयत्न करीत आहे. त्यापैकीच एक प्रयोग म्हणजे परीक्षा महाविद्यालयांनी घेणे हा आहे.

### काही महाविद्यालयांमुळे इतरांना टार्गेट करू नये

गेल्या दहा वर्षापासून महाविद्यालयांनीच परीक्षा घेतल्या आहेत. काही महाविद्यालयात गैरप्रकार घडले हे खरे आहे. परंतू त्यांच्यामुळे उर्वरीत २०० महाविद्यालयांना विद्यापीठ टार्गेट करू शकत नाही. विद्यापीठाने शंका वाटणाऱ्या २१ कॉलेजवर बैठ्या पथकाची नियुक्ती केली आहे. महाविद्यालयांनीही भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. एसआरपीडीच्या रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावला आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी घेतलेल्या परीक्षेतून शैक्षणिक गुणवत्ता टिकणार हे निश्चित.

– डॉ. मंजिरी मोरे
शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य,
शिक्षण प्रसारक मंडळ चेअरमन

### महाविद्यालयाच्या परीक्षेत गैरप्रकार आढळल्यास कारवाई

पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा २२ एप्रिलपासून सुरु होणार आहेत. पदवी प्रथम वर्षाच्या व्दितीय सत्राची परीक्षा महाविद्यालय घेणार आहेत. परंतू विद्यापीठ परीक्षा विभागाची करडी नजर राहणार आहे. गैरप्रकार आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल.

–डॉ. अजितसिंह जाधव, संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2025

सकाळ

# दूरशिक्षण केंद्रात चार नवे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर, ता. २० : 'शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे चालू शैक्षणिक वर्षात चार नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना पूर्णतः ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यात सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर अकौंटिंग, डिजिटल मार्केटिंग, बेसिक्स ऑफ अकौटिंग, फंडामेंटल्स ऑफ इफेक्टिव्ह मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांचा समावेश आहे', अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

नवे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये प्राप्त करून देऊन नोकरीच्या आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून देतील. अभ्यासक्रमांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पूर्णतः ऑनलाईन शिक्षण पद्धती, रेकॉर्डेड अध्ययन साहित्य, विषयतज्ज्ञांशी चर्चा, ऑनलाईन संपर्क सत्रे, आदी आहेत. त्यामुळे विद्यार्थी घरबसल्या आणि नोकरी-व्यवसाय सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. डिजिटल मार्केटिंग, अकाउंटिंगची मूलतत्त्वे, फायनल अकाउंटिंग कौशल्ये, तसेच प्रभावी व्यवस्थापन कौशल्ये आत्मसात करता येणार आहेत.